# पुरवठा विभागात कुठेतरी लिकेज होतंय!

दिन की शुरवात पॉजिटिव सोच के साथ !

पाटोदा लोकवास्तव

WWW.Patodalokvastav.com

संपादक: ऋतुजा पवार

बीड-महाराष्ट्र ▪ वर्ष -१ ▪ अंक १४ ▪ सोमवार दि. २१ ते २८ जुलै, २०२५ ▪ टीसी-एमए एचएम आर 53125 ▪ किंमत २ रूपये ▪ पाने ४ ▪ पान २

BEED-MAHARASHTRA ▪ YEAR -1 ▪ ISSUE-14 ▪ Monday 21 To 28 July, 2025 ▪ TC - MAHMAR53125 ▪ Price-2 Rupees ▪ Pages : 4 ▪ PAGE-2


# पुरवठा विभागाला लागल्या घुशी; माल होतोय गायब ?



## सर्वसामान्य जनतेला मिळणारा गहू तांदूळ गायब होतोय ?

## पुरवठा अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी जनतेच्या तक्रारी पत्रकारांकडे येऊ लागल्या!

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील अनेक गावाच्या तक्रारी पत्रकारांकडे आल्या आहेत. पुरवठा विभागात लिकेज आहे. पुरवठा अधिकाऱ्यांनी ते लिकेज तात्काळ बंद करून जनतेचा हक्काचा माल त्यांना द्यावा अशी वागणी पत्रकारांनी केली आहे अन्यथा.. जे लिकेज आहे ते पण दाखवले जाईल तसेच पुरवठा विभागात घुशी शिरल्याच सुद्धा बोलले जात आहे. काही बंदोबस्त करण्यात यावा असा इशारा पत्रकारांनी दिला आहे.**

सर्वसामान्य जनतेचा हक्काचा माल गहू तांदूळ याव्यतिरिक्त शासनाकडून मिळणार जे धान्य आहे ते जात्या हक्काच्या गरजूवंतांना मिळालं पाहिजे परंतु पुरवठा विभागात कुठेतरी लिकेज असल्याचं समोर येत आहे. पुढारी पुढे यायला तयार नाहीत मग जनतेने डायरेक्ट पत्रकारांची भेट घेतली आणि प्रश्न सोडवण्यासाठी हाक दिली आहे. आता पत्रकारांनी लेखणीतून संबंधित विभागाला सूचना इशारा दिला आहे ची दखल संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा ते लिकेज पत्रकारच बंद करतील आणि सर्वसामान्य जनतेचा थकलेला थकवलेला हक्काचा शासनाकडून मिळणारा माल तात्काळ त्यांना द्यावा अन्यथा पुढील पत्रकारांच्या लेखणीला अधिकाऱ्यांनी सामोरे जावे हा इशारा देण्यात आला आहे... अधिकाऱ्यांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्यांनी जनतेची फसवणूक करू नये दिशाभूल करू नये चांगलं काम करणाराला त्रासही देऊ नये अन्यथा पत्रकार लेखणीतून सगळं उघड करतील हे लिकेज करणाऱ्यांनी लक्षात ठेवावं तसेच पुरवठा विभागात घुशी सरल्याचं कानावर येत आहे. त्यादेखील घुशी बाहेर काढाव्यात असेही आव्हान करण्यात आले आहे.

### पाच सहा महिन्यापासूनचा माल तात्काळ त्यांना द्या

**अनेक ठिकाणच्या तक्रारी आल्या असून पुरवठा विभागाकडून मिळणारा माल जनतेपर्यंत पोहोचला नाही उलट अधिकाऱ्यांकडूनच बोललं जात आहे तुमचा माल पोहोच झाला आहे गाव लेवललाच भांडण लावून देण्याचं काम अधिकारी करत असल्याचा दिसून येत आहे. हे वरिष्ठ लेवल वरून तात्काळ थांबवावं अन्यथा परिणाम वेगळे होतील यात शंका नाही..**


### पुरवठा विभागाचे लिकेज बंद करा

**पुरवठा विभागात लिकेज असल्याचे पुरावे आहेत. संबंधित अधिकाऱ्यांशी ही चर्चा केली आहे. त्यांनी थकलेला माल तात्काळ त्यांचा द्यावा तसेच पुढील माल व्यवस्थित त्यांना पोहोच होईल याची दक्षता घ्यावी.. अन्यथा पत्रकार लेखणीतून पुरवठा विभागाचा लिकेज बंद करतील याची नोंद घ्यावी...**

### अधिकाऱ्यांनी कोणाच्या इशाऱ्यावर काम करू नये

**अधिकारी येतात जातात नेते येतात जातात जनता आहे तिथेच आहे त्यामुळे अधिकाऱ्यांनी कोणत्याही नेत्यांच्या इशाऱ्यावर काम करू नये तसेच जनतेच हक्काचा त्यांना देण्यासाठी प्रयत्न करावेत आणि आपलं कर्तव्य पार पाडावे अन्यथा पत्रकार लेखणीतून तुमचं कर्तव्य दाखवून देतील यात शंका नाही..**

# वाल्मिकला झटका



## बीड कोर्टाच्या निर्णयावर समाधान : देशमुख

### सुनावणीत विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार युक्तिवाद

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराडने दोषमुक्तीसाठी न्यायालयात विनंती अर्ज केला होता. न्यायालयातील या अर्जावर आज सुनावणी झाली असून बीड सत्र न्यायालयाने वाल्मिक कराडचा अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे, देशमुख कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून वाल्मिक कराडसह आरोपींवर आता खंडणीसह खूनाचही खटला चालू राहणार आहे. न्यायालयाच्या या निर्णयाचे वकील उज्ज्वल निकम यांनी स्वागत केल्यानंतर संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांनी देखील समाधान व्यक्त केलं आहे. तसेच, एसआयटीने केलेल्या तपासामुळे हाच निर्णय अपेक्षित होता, असेही त्यांनी म्हटले. वाल्मिक कराडच्या दोषमुक्तीच्या अर्जावर आणि संपत्ती जप्तीबाबत गत सुनावणीत विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी जोरदार युक्तिवाद करत विरोध केला होता. दरम्यान न्यायालयाने दोन्ही बाजूचे युक्तिवाद ऐकल्यानंतर त्यावरील निर्णय राखून ठेवला होता, त्यावर आज सुनावणी झाली. यावेळी वाल्मिक कराडने केलेल्या दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला आहे. तसेच वाल्मिक कराडच्या संपत्ती जप्तीच्या अर्जावरील निर्णय राखून ठेवला आहे. आता, न्यायालयाच्या निर्णयावर धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया देत समाधान व्यक्त केलं आहे.सरपंच देशमुख हत्या प्रकरणात सीआयडी आणि एसआयटीने जो तपास केला, त्यात ठोस पुरावे आहेत. त्यामुळे कराडचा दोष मुक्तीचा अर्ज फेटाळला जाईल, अशी आम्हाला अपेक्षा होती अशी प्रतिक्रिया धनंजय देशमुख यांनी दिली. कराडचा दोष मुक्तीचा अर्ज दाखल झाल्यानंतर सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी हा केविलवाला प्रयत्न असल्याचे म्हटले होते. त्याचाच एक भाग म्हणून आज देखील इतर आरोपींनी दोष मुक्तीचे अर्ज केले आहेत. या लढाईचा शेवट आरोपींना फाशी झाली पाहिजे, असंच आमचे मत असल्याचं देशमुख यांनी म्हटले. दरम्यान, न्यायालयाच्या या निकालानंतर उज्ज्वल निकम यांची मस्साजोग ग्रामस्थांनी भेट घेतली आणि या पुढील लढा तुम्हीच लढा अशी विनंती देखील करण्यात आली.

# राष्ट्रवादी अंमळनेर गटात पूर्ण ताकतीने उतरणार : मंगेश पवार

## मा.आमदार बाळासाहेब आजबे यांचे कार्यकर्ते लागले कामाला!

**पाटोदा । प्रतिनिधी**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमळनेर सर्कल मध्ये मोठ्या ताकतीन जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीत उतरणार असून कार्यकर्त्यांनी कामाला लागा असे आदेश माजी आमदार बाळासाहेब आजबे यांनी सर्व कार्यकर्त्यांना दिले आहेत तसेच ही निवडणूक कार्यकर्त्यांची आहे त्यामुळे सर्वच कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अमळनेर गटप्रमुख मंगेश पवार यांनी सांगितले आहे. निवडणूक कार्यकर्त्यांची कसरत नेत्यांची. आता निवडणूक जरी कार्यकर्त्यांची असली तरी नेत्यांच्या अस्तित्वाची लढाई



झाली आहे. प्रत्येक जिल्हा परिषद गट पंचायत समिती गण हे तितकेच महत्त्वाचे आहेत त्यामुळे सक्षम उमेदवार देण्यासाठी सर्वच आजी-माजी आमदारांनी चाचपणी सुरू केली आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकतीने उतरणार असल्याची माहिती अंमळनेर गट प्रमुख मंगेश पवार यांनी दिली आहे.

### निवडणूक कार्यकर्त्यांची...

**जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक ही कार्यकर्त्यांची असून यामध्ये माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांनी कार्यकर्त्यांच्या निवडणुकीत जोमानं उतरणार असून कार्यकर्त्यांनीही हसून तयारीला लागा असे आव्हान केले आहे. जिल्हा परिषद ,पंचायत समितीमध्ये जनतेच्या हक्काचे उमेदवार बसले पाहिजेत हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून कामाला लागा असेही आव्हान करण्यात आले आहे..**

# वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते लागले निवडणुकीच्या तयारीला!



**पाटोदा । प्रतिनिधी**

## गुरुवारी जि.प. व पं.स. निवडणुकीच्या महत्त्वाच्या बैठकीत उपस्थित रहा : बाळासाहेब गायकवाड

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जवळ येत असून सर्व पक्षांनी उमेदवाराची चाचपणी सुरू केले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाटोदा येथे गुरुवारी महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे या बैठकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष व पक्ष निरीक्षक पाटोदा पुरुषोत्तम वीर यांची उपस्थिती असणार आहे या बैठकीसाठी पाटोदा तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक वंचित बहुजन आघाडी पूर्ण ताकतीने उतरणार आहे. कोणासोबत युती करायची कोणासोबत नाही. निवडणूक कशा पद्धतीने लढवायची आणि जिंकायची तसेच निवडणुकीत कशा पद्धतीने रणनीती आखायची यासाठी गुरुवार दिनांक २४ रोजी महत्त्वाची बैठक पाटोदा येथील विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली आहे. बैठकीसाठी जिल्हा उपाध्यक्ष पक्षनिरीक्षक पाटोदा पुरुषोत्तम वीर यांच्यासह पाटोदा तालुक्यातील सर्व ज्येष्ठ आजी माझी पदाधिकारी, कार्यकर्ते, मार्गदर्शक उपस्थित राहणार आहेत तरी पाटोदा तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या बैठकीसाठी उपस्थित राहण्याचे आव्हान तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांनी केले आहे.

# अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम!

## शिक्षण विभागाच्या दिरंगाई बद्दल पालकांमधून नाराजी



**बीड । प्रतिनिधी**

अकरावीची प्रवेश प्रक्रिया लांबल्यामुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाच्या दिरंगाईबद्दल पालकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. दहावीचा निकाल लागून बराच का लोटला तरी कोणत्या विद्यालयात प्रवेश मिळणार आणि विज्ञान वाणिज्य की कला शाखा निवडायची याबाबत विद्यार्थ्यांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे...

प्रवेश निश्चित नसल्याने त्यांना अभ्यासाला सुरुवात करता येत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट सुविधा आणि माहितीच्या अभावामुळे अधिक अडचणींना तोंड द्यावे लागतात आणि भविष्याची चिंता विद्यार्थ्यांवर मोठा मानसिकता निर्माण करत आहे. मुलांच्या भविष्याच्या चिंतेत पालकही हवालदिल झाले आहेत. प्रवेशासाठी विविध महाविद्यालयामध्ये चौकशी करण्यासाठी आणि माहिती मिळवण्यासाठी त्यांचा वेळ वाया जात आहे. प्रवेशाची रक्कम आणि इतर खर्चाची आर्थिक नियोजन करणे ही त्यांना कठीण झाले आहे. शिक्षण संस्थांनीही या प्रकरणी हातबलता व्यक्त केली आहे. या लांबलेल्या प्रवेश प्रक्रियेचा विद्यार्थी आणि पालक या दोघांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक आयुष्यावर नकारात्मक परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने या प्रक्रिये तातडीने लक्ष घालून प्रवेश प्रक्रियेतील अडथळे दूर करावेत अशी मागणी केली जात आहे. दरम्यान अकरावी प्रवेशाची दुसरी फेरी सुरू असून याची यादी प्रसिद्ध झाली आहे तसेच कनिष्ठ विद्यालयातील प्रवेश प्रक्रिया ५० टक्के पूर्ण झाली आहे.

### ऑनलाइन प्रणालीत अडचणी

**काही विद्यार्थी एकावेळी इतर अभ्यासक्रम किंवा स्पर्धा परीक्षेच्या तयारीतही असतात अकरावी प्रवेश प्रक्रियेतील विलंबामुळे त्या नियोजनावर परिणाम झाला आहे तसेच प्रवेश याबाबत वारंवार बदलणारे नियम फेर तपासणी यादी आणि ऑनलाइन प्रणालीतील अडचणी यामुळे पालक आणि विद्यार्थी अधिक गोंधळलेला आहे.**


## तालुका/शहर/विशेष प्रतिनिधी नेमणे आहे

पाटोदा लोकवास्तव

www.patodalokvastav.com

साप्ताहिक पाटोदा लोकवास्तव चा सडेतोड लेखणीमुळे अगदी एका वर्षाच्या काळात वाचकांच्या मनातील लेखणी सत्यात उतरवणाऱ्या साप्ताहिक पाटोदा लोकवास्तव साठी खालील तालुका, शहर तसेच काही विशेष प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत. आपल्या परिसरातील लेखणीची आवड असणाऱ्या व तालुक्यातील राजकीय, सामाजिक, भौगोलिक माहिती असणाऱ्या इच्छुकांनी संपर्क करावा..

तालुका प्रतिनिधी : आष्टी, पाटोदा, शिरूर, बीड, गेवराई, माजलगाव, केज, अंबाजोगाई, परळी, धारूर, वडवणी.

सर्व तालुक्यात विशेष व शहर प्रतिनिधी


संपर्क : ९९२१८०१९१९/९८०९२८७७७७

साप्ताहिक पाटोदा लोकवास्तव कार्यालय, कुसळंब, ता.पाटोदा जि.बीड


# महादेव मुंडेंचा गळा कापला; तोंड, मान, हातावर १६ वार

## शवविच्छेदन अहवालातून गुन्हेगारांची क्रूरता; अंगावर काटा आणणारी माहिती समोर

**बीड । प्रतिनिधी**



परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणाचा शवविच्छेदन रिपोर्ट हाती लागला असून, यात अंगावर काटा आणणारी माहिती समोर आली आहे. महादेव यांचा अगोदर गळा कापला. तब्बल २० सेंमीपर्यंत लांब, ८ सेंमी रुंद आणि ३ सेंमी खोल असा हा वार होता. त्यानंतर त्यांच्या मानेवर उजव्या बाजूने चार वार करण्यात आले. मुंडे यांच्या अंगावर तब्बल १६ वार आहेत. प्रतिकार करतानाही त्यांच्या हाताला जखमा झाल्याचे अहवालात नमूद आहे. २१ ऑक्टोबर रोजी महादेव मुंडे यांचा खून झाला. २२ ऑक्टोबर रोजी १२:१५ ते १:३० असे सव्वा तास परळी उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन चालले. पोलिसांनी पंचनामा केला असता त्यात अंगावर जखमा झाल्याने मृत्यू झाल्याचे नमूद होते. त्यांच्या अंगावर रक्ताने माखलेली पांढरी बनियान, ब्राऊन कलरचा शर्ट होता. लाल करदोडा आणि पाकीट होते. चेहरा, छाती आणि हात रक्ताने माखलेले होते. सव्वा तास हे पीएम चालले होते. २० महिन्यांनंतरही यातील आरोपी निष्पन्न नाहीत. त्यामुळेच त्यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केला होता. मृत्यूचे कारण काय? डॉक्टरांनी शवविच्छेदन अहवाल परळी शहर पोलिसांना दिला होता. त्यात अतिरक्तस्राव झाल्याने शॉकमध्ये जाऊन महादेव मुंडे यांचा मृत्यू झाल्याचे नमूद केले आहे. सननलिका कापली महादेव मुंडे यांच्या गळ्यावर समोरून वार केल्याने श्वसननलिका कापली गेली होती. शिवाय मोठ्या रक्तवाहिन्याही तुटल्या होत्या. महादेव मुंडे यांनी दोन्ही हाताने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या डाव्या आणि उजव्या हातावर अंगठ्याजवळ, तळहातावर आणि मधल्या बोटाजवळ जखमा झालेल्या होत्या. तसेच खाली पडल्यानंतर त्यांच्या डाव्या गुडघ्यालाही खरचटल्याची नोंद आहे. कोठे किती वार? मानेवर उजव्या बाजूला ४ तोंडापासून गालापर्यंत १ उजव्या हातावर ३ डाव्या हातावर ३ तोंडावर १ नाकावर गळ्यावर ३ तोंडापासून कानापर्यंत वार मानेवर वार करत असताना तो चुकविल्याने तोंडावरही वार झाल्याची शक्यता आहे. तोंडापासून कानापर्यंतही एक वार झाल्याचे नमूद असून, त्याची लांबी १३ सेंमी एवढी असून, रुंदी व खोली दीड सेंमीपर्यंत आहे.

# संपादकीय

## चैतन्यी समरस व्हावे

श्रवणाशिवाय पारमार्थिक प्रगती होणे जवळ जवळ अशक्य असते. जेवल्याशिवाय पोट भरणे जितके अशक्य; तितके श्रवणाशिवाय परमार्थ होणे अशक्य आहे, असे समर्थांनी निक्षून सांगितले आहे. गुरुवाक्ये चित्त रमावे। चैतन्यी समरस व्हावे।।' : स्वामी मकरंदनाथ. परमार्थाचा मार्ग दाखवणाऱ्या कोणत्याही संप्रदायात प्रामुख्याने सांगितल्या जाणाऱ्या साधना म्हणजे ध्यान व नामस्मरण. यांच्या जोडीला गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध यांसारख्या अद्वैत ग्रंथांचे श्रवण; शक्यतो गुरुमुखातून अथवा एखाद्या प्रगत साधकाकडून व्हायला हवे. श्रवणाशिवाय पारमार्थिक प्रगती होणे जवळ जवळ अशक्य असते. जेवल्याशिवाय पोट भरणे जितके अशक्य; तितके श्रवणाशिवाय परमार्थ होणे अशक्य आहे, असे समर्थांनी निक्षून सांगितले आहे. 'ऐका परमार्थाचे साधन। जेणे होये समाधान। ते तू जाण गा श्रवण। निश्चयेंसी।। (दा. ७-८-१) श्रवण झाल्यावर मनन व निदिध्यास आवश्यक आहे. 'श्रवण मनन निदिध्यास (म्हणजे अनुसंधान)। प्रचितीने बाणता विश्वास। रोकडा साक्षात्कार, सायास। करणेचि नलगे।। (दा. १०-९-३०) या पद्धतीने, या मार्गाने अभ्यास केल्यास साधकाचे जीवन धन्य होते. सर्व प्राप्त कर्मे करीत असतानाही चौथ्या पुरुषार्थाला (मोक्षाला) तो सहज प्राप्त होतो. तो जेथे जाईल तेथे आनंद व समाधान यांचा वर्षाव होतो. इतरांनाही त्याच्यापासून परमार्थमार्गाची स्फूर्ती मिळते व पर्यायाने त्याचाही संसार धन्य होतो. अनादि काळापासून ऋषिमुनी, थोर आचार्य, ज्ञानदेवादि संत यांनी जीवनाच्या या सफलतेचा मार्ग आखून दिला आहे. सर्व संप्रदायांतील सद्गुरूंना हेच अभिप्रेत आहे, हे त्यांच्या ग्रंथांवरून सहजच लक्षात येते. सर्व संप्रदायांतील सात्विक साधकांनी एकत्र येऊन आपापल्या शक्तिबुद्धीप्रमाणे हा बोध समाजामध्ये ठसविल्यास समर्थांचे 'आनंदवनभुवना'चे स्वप्न साकार झाल्याखेरीज राहणार नाही. स्वामी माधवनाथ कृतार्थ जीवनाची पाच मूलतत्त्वे सांगतात - आपली शरीरप्रकृती चांगली ठेवली पाहिजे, हे पहिले तत्त्व. आपण स्वत:च्या पायावर उभे व्हावे, आपल्या पोटापुरते आपण मिळविले पाहिजे, हे दुसरे तत्त्व. आपले कुटुंबीय, बायकामुले यांची काळजी घेतली पाहिजे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, हे तिसरे तत्त्व. आपला एक समाज आहे, राष्ट्र आहे, त्याकरिता आपल्या अल्प शक्तिबुद्धीप्रमाणे कर्तव्यकर्म केले पाहिजे, हे चौथे तत्त्व. जीवनाचे ध्येय आत्मदर्शन हेच आहे, याविषयी नि:संदिग्ध, नि:संशय असणे हे शेवटचे आणि सर्वांत महत्त्वाचे तत्त्व. जीवनात या सर्व तत्त्वांचे परिशीलन झाले पाहिजे. जो कोणी या पाच तत्त्वांनुसार जीवन जगेल, तो कृतार्थच होईल.

# साध्या लग्न पद्धतीचा आदर्श: तरुण पिढीने घडवावे परिवर्तन

**मा. कोमलताई बनकर, बीड यांनी व्यक्त केलेल्या विचारांमधून आजच्या तरुण-तरुणींसाठी एक महत्त्वाचा संदेश समोर येतो: साध्या आणि सोप्या लग्न पद्धतीचा अवलंब करून समाजापुढे नवा आदर्श उभा करा. आजच्या काळात लग्न समारंभ म्हणजे केवळ आनंदाचा सोहळा न राहता, एक आर्थिक ओझे बनत चालले आहे. मोठमोठ्या लग्नांच्या स्पर्धेत अनेक कुटुंबे कर्जबाजारी होत आहेत, तर काहींना आपली जमीन-जुमला विकावा लागत आहे. अशा परिस्थितीत तरुण पिढीने आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून, अवाढव्य खर्च टाळून साध्या पद्धतीने लग्न करण्याचा आदर्श घालून द्यावा.**





### स्पर्धेच्या मागे न लागता, भविष्याचा विचार करा

लग्नावर होणारा प्रचंड खर्च हा केवळ एका दिवसाचा सोहळा साजरा करण्यासाठी नसून, तो मुला-मुलींच्या भविष्याला बांधून टाकणारा ठरतो. हा पैसा जर शिक्षण, व्यवसाय, किंवा इतर गरजांसाठी वापरला तर नव्या जोडप्याचं आयुष्य अधिक सुखकर होऊ शकतं. श्रीमंतांचे अंधानुकरण करून गरीब कुटुंबांनी स्वत:ला कर्जाच्या खाईत लोटण्यापेक्षा, साध्या पद्धतीने लग्न करून समाजाला नवा संदेश द्यावा. साधेपणा हा केवळ आर्थिक बचतीचाच प्रश्न नाही, तर तो मूल्यांचा आणि संस्कृतीचा देखील प्रश्न आहे.

### साधेपणा हाच खरा श्रीमंतीचा मार्ग

साध्या लग्न पद्धतीचा अवलंब करणे म्हणजे केवळ पैशाची बचत नव्हे, तर एका नव्या, समृद्ध आणि जबाबदार समाजाची उभारणी आहे. श्रीमंतांचे अंधानुकरण करण्यापेक्षा, आपल्या परिस्थितीला साजेसे आणि मूल्यांवर आधारित आयुष्य जगण्याचा मार्ग तरुणांनी निवडावा. मा. कोमलताई बनकर यांचा हा संदेश प्रत्येक तरुण-तरुणीने आत्मसात करून, समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी पुढाकार घ्यावा. साधेपणातच खरी श्रीमंती आहे, आणि हा आदर्श घालून देण्याची जबाबदारी आजच्या तरुण पिढीवर आहे...

### तरुण पिढीसमोर आव्हान आणि संधी

आजच्या तरुण-तरुणींमध्ये समाजाला नवं दिशादर्शन देण्याची ताकद आहे. साध्या लग्न पद्धतीचा अवलंब करून ते नवा आदर्श निर्माण करू शकतात. यासाठी काही सोप्या पण प्रभावी पावलं उचलता येतील: लग्न समारंभ साधा ठेवा: मर्यादित पाहुणे, साधी सजावट आणि स्थानिक संसाधनांचा वापर करा. आर्थिक नियोजन: लग्नासाठीचा खर्च काटेकोरपणे नियोजित करा आणि भविष्यासाठी बचत करा. सामाजिक संदेश: साध्या लग्नाच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक संदेश द्या. परंपरांचा आदर: साधेपणातही आपल्या सांस्कृतिक आणि पारंपरिक मूल्यांचा आदर राखा.

### महाराष्ट्राच्या संत परंपरेचा आदर्श

महाराष्ट्राला संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, आणि समाजसुधारक जैसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वांची प्रेरणादायी परंपरा लाभली आहे. या महामानवांनी साधेपणा, समता आणि समाजहित यांना नेहमीच प्राधान्य दिले. आजच्या तरुणांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन, लग्नासारख्या पवित्र सोहळ्याला साध्या पण अर्थपूर्ण स्वरूपात साजरे करावे. अशा पद्धतीने केलेले लग्न केवळ कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण समाजाला प्रेरणा देऊ शकते.

# नफरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांनी गिरवला लोकशाहीचा धडा!

## शालेय मुख्यमंत्री पदासाठी केले मतदान

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील आय एस ओ मानांकित जि.प.प्रा.शा.नफरवाडी येथे शालेय मुख्यमंत्री पदाची निवडणूक ईव्हीएम मशीनच्या सहाय्याने घेण्यात आली.या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरणे,मतदार यादी प्रसिद्ध करणे,अर्जाची छाननी करणे, सूचक,अनुमोदक,अपूर्ण अर्ज बाद करणे,अर्ज मागे घेणे, प्रचार करणे या सर्व बाबी करण्यात आल्या. मतदान कक्ष,मतदान अधिकारी, मतदान प्रतिनिधी नेमण्यात आले.शेवटी मतदान घेवून निकाल जाहीर करण्यात आला.**



### विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड


प्रत्यक्ष मतदान करून बुथच्या बाहेर आल्यावर प्रौढ मतदारांनाही होणार नाही एवढा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.शाळेत शिकवलेला प्रौढ मताधिकार बजावताना विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची अनुभवासी सांगड घालण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून करण्यात आले.

– मुख्याध्यापक
अण्णासाहेब खंडागळे जि.प.प्रा.शा.नफरवाडी ता.पाटोदा जि.बीड.

या उपक्रमातून लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव सर्व विद्यार्थ्यांनी घेतला.भारतीय लोकशाहीतला प्रौढ मताधिकार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजला, योग्य उमेदवार निवडणे,प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रियेत भाग घेणे इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रेरित करणे या जबाबदाऱ्यांची अनुभूती विद्यार्थ्यांना आली. आई-वडील किंवा घरातील इतर प्रौढ व्यक्ती मतदान करतात मग ती प्रक्रिया कशी असेल ? विद्यार्थ्यांचा मनातील या जिज्ञासेचे उत्तर स्वतः विद्यार्थ्यांना कृतीतून मिळाले. प्रत्यक्ष निवडणुकीप्रमाणे शाळेतील शिक्षकांच्या संकल्पनेतून शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक घेण्याचे नियोजन केले या मध्ये प च्या माध्यमातून ईव्हीएम मशीन तयार करण्यात आले त्यावर उमेदवारांचे नाव आणि फोटो ऍड करून बॅलेट आणि कंट्रोल युनिट तयार करण्यात आले.इच्छुक उमेदवारांना प्रचारासाठी दोन दिवस वेळ देण्यात आला.शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अभिरुप मतदानाचे प्रात्यक्षिक दाखवून मतदान प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.या निवडणुकीसाठी ९ उमेदवार आणि शेवटी छजढ-अशी रचना र्शीं वर करण्यात आली होती.सदरील ईव्हीएम वर आजची मतदान प्रक्रिया पार पडली.शाळेतील सर्व विद्यार्थी,शिक्षक यांनी सहभाग घेतला.एकूण मतदान ११८ झाले.शेवटी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सर्व उमेदवार व मतदान प्रतिनिधी यांच्यासमोर मतमोजणी करून निकाल जाहीर केला, शाळेतील विद्यार्थिनी चैताली बाळू ढोले हिला ६० मतदान झाले तिला ४८ मतांनी विजेता घोषित करण्यात आले.तद्नंतर शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी नवनिर्वाचित मुख्यमंत्री चैताली हिचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.चैताली ढोले हिने आपले मनोगत व्यक्त करून सर्व मतदारांचे आभार व्यक्त केले.या निवडीनंतर सर्व विद्यार्थ्यांनी तु चाल पुढं तुला रं गड्या भिती कशाची या गीतावर ठेका धरत नृत्य करत आनंद साजरा केला.उमेदवार म्हणून चैताली ढोले,सोहम मंडलिक,जयराम वाघ,विठ्ठल दराडे,दिपाली ढोले,दर्शन मंडलिक,काजल दराडे,राधिका मंडलिक, भूमिका मंडलिक हे होते.प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये केंद्राध्यक्ष सोहम वायकर आणि श्रेयस ढेरे,मतदान अधिकारी १ आरती सवासे,मतदान अधिकारी २ सविता मुळे,मतदान अधिकारी ३ कल्याणी तळेकर तसेच मतदान प्रतिनिधी म्हणून समृद्धी तांबे,सुजाता सस्ते,साक्षी तांबे,महेश दराडे यांनी कामकाज केले.निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब खंडागळे सर तसेच शाळेतील शिक्षक सचिन राऊत सर, रमेश मुरूमकर सर,शकुंतला काकडे मॅडम,सारिका वावरे मॅडम यांनी काम पाहिले.

# कृषी सह रमी मंत्रीपदाचा पदभार कोकाटेंवर आल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ!

## कृषी खात्यातून मुक्त करून कोकाटेंकडे रम्मी मंत्रीपदाचा वेगळा पदभार द्यावा!



छत्रपती संभाजीनगर : वृत्तांत

पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आहे. शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली असताना, राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे मात्र विधिमंडळात रमी खेळत असल्याचे दिसले. अशा असंवेदनशील कृषिमंत्र्यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने राजीनामा घ्यावा. त्यांना रमी खेळण्यासाठी घरी बसवा, अशी मागणी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी रविवारी येथे पत्रकार परिषदेत केली. दानवे म्हणाले, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट आले. बोगस बियाण्यांच्या तक्रारी आहेत, अन् कृषिमंत्री कोकाटे सभागृहात रमी खेळत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. असा मंत्री मंत्रिमंडळात आहे, याचा अर्थ मुख्यमंत्री फडणवीस यांची काहीतरी मजबुरी असेल, असा टोला त्यांनी लगावला.

### शेतकऱ्यांशी काही देणेघेणे नाही

शेतकरी मरतोय आणि कृषिमंत्री रमी खेळतात. या सरकारला शेतकऱ्यांशी काही देणेघेणे नाही, भाजपने कोकाटे यांना नावालाच मंत्री केले, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

### ही त्यांची आठवी ते नववी चूक

कृषिमंत्र्यांची ही आठवी ते नववी चूक असेल. यांच्याकडून काय अपेक्षा करायच्या? शेतकऱ्यांना सांगायचे, तुम्ही दारू पिता, लग्नात खर्च होतो, म्हणून कर्ज होत आहे आणि कृषिमंत्रीच रमी खेळतो, असे शेतकरी नेते बच्चू कडू म्हणाले.

### हकालपट्टी करा : सुळे

कृषिमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, नाही तर मुख्यमंत्र्यांची त्यांची हकालपट्टी करावी, अशी मागणी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. ऑनलाइन गेमिंगमुळे कुटुंब बरबाद होत असल्याने त्याच्यावर बंदीची मागणी होत आहे. दुसरीकडे कृषिमंत्री सभागृहातच मोबाइलवर रमी खेळत आहेत, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

### मंत्री प्रताप सरनाईक यांचा अजब तर्क

शिंदेसेनेचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावर प्रतिक्रिया देताना अजब तर्क लढवला. आमिर खान, शाहरूख खानही रमी खेळतात. टीव्हीवाल्यांना तो चांगला गेम वाटत असेल. जुगार म्हणून योग्य नाही, मनोरंजन म्हणून त्याकडे बघितले जात असेल तर योग्य आहे, असे सरनाईक म्हणाले.

### भिकाऱ्यांसोबत केली होती तुलना

याच कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांची तुलना भिकाऱ्यांसोबत केली होती. हा माणूस सभागृहात रमी खेळत असेल, तर त्यांची तुलना कुणासोबत करायची? असा प्रश्न शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी विचारला.

### हे योग्य नाही

हा शिष्टाचाराचा, संकेतांचा भाग आहे. विधानसभेची जागा पवित्र आहे. हे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया भाजपचे माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

# निवडणुकीचे वारे; जिल्हा परिषद, पंचायत समिती गट, गणांची संख्या मराठवाड्यात वाढली

## निवडणूक आयोग सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीत




छत्रपती संभाजीनगर : मराठवाड्यात जि. प. गट व पं. स.ची प्रभाग रचना झाली. त्यावर आक्षेप नोंदविण्याची मुदतही सोमवारी संपली. विभागात जि. प.चे सहा गट तर पं. स.चे १२ गण वाढले आहेत. त्यानुसार प्रभाग रचना करण्यात आली आहे.

२०२० पासून आजवर विभागातील ८ जि. प.च्या व ७६ पं. स. निवडणुकांचा कार्यकाळ टप्प्याटप्प्याने संपला. त्यावर प्रशासक होते. मे महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचा मार्ग मोकळा केल्यानंतर निवडणूक आयोग सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार विभागाची लोकसंख्या १ कोटी ८७ लाख ३७ हजार ७३२ आहे. त्याआधारे प्रारूप गट व गण रचना केलेली आहे. विधानसभा निवडणुकीत मराठवाड्यात १ कोटी ५६ लाख ३६ हजार ४६४ मतदार होते. २०११ची लोकसंख्या आणि डिसेंबर २०२४ पर्यंतची मतदारसंख्या यात ३१ लाख १ हजार २६८ इतका फरक आहे. छत्रपती संभाजीनगर जि. प. गट : ६३ पंचायत समिती गण : १२६ वाढ : गट-१, गण-२ परभणी जि. प. गट : ५४ पं. स. गण : १०८ वाढ : नाही जालना जि. प. गट : ५७ पं. स. गण : ११४ वाढ : गट-१, गण-२ हिंगोली जि. प. गट : ५२ पं. स. गण : १०४ वाढ : नाही नांदेड जि. प. गट : ६५ पं. स. गण : १३० वाढ : गट-२, गण-४ बीड जि. प. गट : ६१ पं. स. गण : १२२ वाढ : गट-१, गण-२ लातूर जि. प. गट : ५९ पं. स. गण : ११८ वाढ : गट-१, गण-२ धाराशिव जि. प. गट : ५५ पं. स. गण : ११० वाढ : नाही मराठवाड्यात १ कोटी ५६ लाख मतदार विधानसभा निवडणुकीत मराठवाड्यात १ कोटी ५६ लाख ३६ हजार ४६४ मतदार होते. विभागात २ लाख ४२ हजार ३५२ मतदार वाढले होते. आगामी जि. प., पं. स. निवडणुकीपर्यंत हा आकडा बदललेला असेल. १६,८२६ मतदान केंद्र विधानसभा निवडणुकीत होते. मतदार संख्येत राजधानी आघाडीवर छत्रपती संभाजीनगर : ३१ लाख ७६ हजार ८३० जालना : १६ लाख २३ हजार ९४३ परभणी : १५ लाख ३२ हजार ३०७ हिंगोली : ९ लाख ७४ हजार ५४१ नांदेड : २७ लाख ५१ हजार ६३८ लातूर : २० लाख १६ हजार ९९० धाराशिव : १३ लाख ९४ हजार १२ बीड : २१ लाख ९७ हजार ८३० (डिसेंबर २०२४ पर्यंत)

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयास माजी विद्यार्थ्यांकडून १ लाख रुपये किमतीचे ३० बेंच भेट!

## दहावी २००५ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून आदर्श उपक्रम!



### भावी पिढीचे शैक्षणिक भविष्य घडणार



माजी विद्यार्थ्यांच्या एकत्र प्रयत्नातून शाळेला भौतिक सुविधा पूर्ण होतील. यातूनच भावी पिढीचे शैक्षणिक भविष्य घडणार आहे. एसएससी २००५ च्या बॅचच्या माध्यमातून आम्ही स्टेज व बेंचचा प्रश्न सोडवला आहे. पुढील काळात ही विद्यालयास सहकार्य करण्यासाठी प्रयत्न करू...

– अशोक पठाडे
(माजी विद्यार्थी एस.एस.सी. बॅच २००५)

**जामखेड | प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील एसएससी बॅच मार्च २००५ मधील विद्यार्थी - विद्यार्थिनींचा स्नेहसंमेलन कार्यक्रम शुक्रवार ११ जुलै रोजी पार पडला. एसएससी बॅच मार्च २००५ मधील ८० विद्यार्थी विद्यार्थिनी यावेळी सहभागी होते.

स्नेह संमेलन कार्यक्रमाच्या माध्यमातुन सर्व मित्र - मैत्रिणी २० वर्षानंतर एकत्र आले होते.जून्या - नव्या आठवणींना उजाळा देत एकमेकांच्या सूख - दुःखात पुढील काळात मदत करणे व सहभागी होण्याचे सर्वांनी ठरवले.तसेच ज्या शाळेने आपणाला घडवले व जून्या आठवणी दिल्या त्या शाळेला वस्तू रुपी भरीव मदत स्वरुपात १ लाख रुपये किमतीचे ३० बेंच भेट देण्यात आले.SSC बॅचच्या वतीने भावी पिढीला शैक्षणिक संधी मिळतील हा या ग्रुपचा व स्नेह संमेलन कार्यक्रमाचा उद्देश होता.शाळेत सकाळी ११ वाजता सर्वजण जमले. बरोबर ११ वाजता शाळेची घंटा वाजल्यावर परिपाठ घेण्यात आला. माजी मुख्याध्यापक श्री. सदाफुले सर यांनी परिपाठ घेतला. स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष श्री शहाजी पाटील, सदस्य दत्तात्रेय हजारे आण्णा, गौतम मते तसेच विद्यालयाचे सध्याचे प्राचार्य श्री जोरे सर उपस्थित होते.या स्नेह संमेलन कार्यक्रमासाठी नाष्टा, जेवण याची पूर्ण सोय युवा उद्योजक मा. विकी शेठ मंडलेचा यांनी केली. तसेच सत्कार व शुभेच्छा खर्चाचा पूर्ण भार युवा उद्योजक मा. अनिल शेठ मते उचलला. डील २००५ बॅच मधील सर्व विद्यार्थी विद्यार्थिनीनी सर्वांनी मिळून १ लाख रुपये किमतीचे ३० बेंच शाळेला भेट दिले. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे या बॅच मधील विद्यार्थी मा. दादा नामदेव लोंढे यांनी स्टेज बांधून देण्याचे घोषित केले.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरूवात झाली.कार्यक्रम सुरू झाल्यावर विद्यार्थी परिचय, उद्योग, शिक्षण यावर चर्चा झाली. सूत्रसंचालन शिक्षक मा. संतोष सरसमकर सर यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार सौ. रसिका वाळके यांनी मानले.

# जनमेजय प्राथमिक विद्यामंदिर बीड येथे अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन साजरा

**बीड | प्रतिनिधी**

दिनांक १८ जुलै, बीड . जनमेजय प्राथमिक विद्यामंदिर येथे अण्णाभाऊ स्मृतिदिन साजरा करण्यात आला . कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक श्री सुपेकर सर यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. शाळेचे शिक्षक श्री चोरमले सर यांनी अण्णाभाऊंच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की अण्णाभाऊंनी जीवनभर समाजातील गोरगरीब आणि वंचित दलितांसाठी लढा दिला. त्यांच्या कार्यामुळे समाजाला एक नवी दिशा मिळाली. काही विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊंच्या कार्यावर गाणी पोवाडे भाषणे सादर केले.



विद्यार्थ्यांनी फकीरा वैजयंता यासारख्या प्रसिद्ध कलाकृतीवर प्रकाश टाकला. शेवटी नरवडे सर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी शाळेतील श्री निर्धार सर श्री शिंदे सर श्री नरवडे सर श्री शिंदे गोरख सर सौ कांडेकर मॅडम सौ पवार मॅडम सौ. मोरे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# अंमळनेर गटात तुतारीचा आवाज निघणार!

## सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, अतुल शेलार रिंगणात उतरण्याची शक्यता!







### वैचारिक उमेदवाराची आवश्यकता

**जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये अमळनेर जिल्हा परिषद पंचायत समिती गटामध्ये वैचारिक उमेदवार असावा अशी चर्चा सुरू आहे. युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार हे या चौकटीत परफेक्ट बसतात या अनुषंगाने जनतेकडून यांना निवडणुकीत उतरण्याची मागणी होत आहे.**

**पाटोदा | प्रतिनिधी**

जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक येणाऱ्या काही दिवसातच निवडणूक होईल अशी चित्र दिसत आहे. अमळनेर जिल्हा परिषद पंचायत समिती गटात तुतारी कडून युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार, सामाजिक कार्यकर्ते अतुल शेलार हे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे.. अमळनेर जिल्हा परिषद गट हा शरदचंद्रजी पवार साहेब यांना मानणारा गट मानला जातो या गटामध्ये पवार साहेबांच्या विचाराचे म्हणजेच पुरोगामी विचाराचे लोक मोठ्या प्रमाणात आहेत त्यामुळे वैचारिक दृष्ट्या आणि जनतेच्या हिताचा विचार करणारा उमेदवार या गटात निवडून येईल आणि अशा पद्धतीनेच उमेदवार जनतेला अपेक्षित आहे त्यामुळे तूतरी कडून सामाजिक कार्यकर्ते आणि चळवळीतील कार्यकर्ता अतुल शेलार, युवा नेते सुग्रीव पवार, मेजर शिवाजी पवार हे रिंगणात उतरण्याची शक्यता आहे. याव्यतिरिक्त अजूनही उमेदवार पुढे येऊ शकतात परंतु सध्या तरी यांचेच नाव चर्चेत आहे. मग जिल्हा परिषद असो की पंचायत समिती असो पक्ष जो आदेश देईल त्या ठिकाणी लढायला तिघेही तयार आहेत अजूनही नावे पुढे येऊ शकतात.. काही झालं तरी अमळनेर जिल्हा परिषद गटात तुतारी जोरात वाजेल असाच अंदाज वर्तवला जात आहे..

### विकासाची दूरदृष्टी आणि विचार आणि परिपक्व उमेदवार हवा

**सर्वसामान्य जनता म्हणत आहे विकासाची दूरदृष्टी असलेला आणि विचार आणि परिपक्व असलेला उमेदवार आम्हाला हवा आहे. भ्रष्टाचाराला आळा आणि सामाजिक प्रबोधन करत विचाराची दूरदृष्टी घेऊन चलणारा उमेदवार जर मिळाला तर जिल्हा परिषदेमधून येणारे कामे जनतेपर्यंत पोचतील आणि विकासाला चालना मिळेल म्हणूनच विकासाची दूरदृष्टी विचार आणि परिपक्व उमेदवार हवा आहे अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.**

# जिल्हा परिषद निवडणूक नव्हे ; नेत्यांची परीक्षाच!

पाटोदा लोकवास्तव
WWW.Patodalokvastav.com
सोमवार दि. २१ जुलै, २०२५ पान-४

## नेत्यांनी व उमेदवारांना जिल्हापरिषदेच्या कामांची यादी द्यावी

येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीतील उमेदवार आणि ते मंडळींनी प्रचारासाठी येताना जिल्हा परिषदेतून कोणते कामे सर्वसामान्य जनतेच्या हिताची असतात आणि पंचायत समितीतून जनतेची कोणती हक्काची कामे असतात हे घेऊन यावे अन्यथा मत मागण्यासाठी येऊ नये असेही बोलले जात आहे. जिल्हा परिषद उमेदवाराचं काम आणि पंचायत समिती उमेदवाराचे काम काय असतं हेच जनतेला आधी सांगावं नंतर मत मागाव असेही सर्वसामान्य जनतेच्या चर्चा समोर येत आहेत...

# जिल्हा परिषद निवडणुकीत नेत्यांनी अन् उमेदवाराने खोटं बोलायचं नाही!

## २०17 पासून जनतेने केला लेखाजोखा आता पुढे काय जनता ठरवणार



### निवडणुकीत खोटं बोलायचं नाही

सोशल मीडिया हे सर्वसामान्य जनतेचे शस्त्र झाल आहे. येणाऱ्या निवडणुकीत आता खोटं बोलायचं नाही असंच बोललं जात आहे. जो उमेदवार, नेता खोटं बोलेल त्याचा सोशल मीडियातून करेक्ट कार्यक्रम केला जाईल असेही सर्वसामान्य जनतेतून चर्चा येत आहे..

### जनतेच शस्त्र सोशल मीडिया!

नेते उमेदवार निवडणुकीत जे आश्वासन देतात ते पूर्ण करतात की नाही हे दाखवण्यासाठी जनतेच्या हातामध्ये आता सोशल मीडिया आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून नेत्यांनी उमेदवारांनी केलेली फसवणूक उघडपणे सोशल मीडियातून दाखवली जाईल त्यामुळे उमेदवार आणि नेत्यांनी आश्वासन दिले आणि पूर्ण केले असतील तरच निवडणुकीत उतरावे अन्यथा सोशल मीडियातून होणारे धारदार वार झेलण्याची तयारी ठेवावी असेही आव्हान सर्वसामान्य जनता करत आहे...

## जिल्हा परिषद अन् पंचायत समित मध्ये जनतेच्या हक्काचं काय ? त्याची यादी आणावी ; मगच मतदान!

**बीड । सचिन पवार**

बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता आता २०१७ पासून जिल्हा परिषद अंतर्गत केलेल्या कामाचा लेखाजोखा करणार आहे. येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत नेत्यांची परीक्षा घेतली जाईल असाच वातावरण दिसणार आहे. १७ पासून आत्तापर्यंत केलेल्या कामाचा लेखाजो का आणि भविष्यात काम करणारा उमेदवार कसा हवा याचा अहवाल जनतेनेच तयार केला आहे. आता निवडणुकीला सामोरे जाताना उमेदवार आणि ही आपली पात्रता समजून उतरावे असं जनतेने आव्हान केले आहे... सोशल मीडियाचा आता मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. नेत्यांनी दिलेले आश्वासन ते पूर्ण झाले की नाही हे लगेच सोशल मीडियावर येत आहेत. नेत्यांनी जर फसवणूक केली असेल तर त्याला उत्तर सोशल मीडियावर लगेच दिल्या जात आहे. त्यामुळे निवडणुकीत उतरताना उमेदवारांनी ही सगळा विचार करावा आणि मगच निवडणुकीच्या रिंगणात उतरावं उगच उचलायची जीभ आणि लावायची टाळ्याला नको त्यामुळे जनता ही आव्हान करत आहे निवडणुकीच्या रिंगणात उतरताना उमेदवाराने स्वतःची पात्रता तपासावी आणि नंतरच निवडणुकीच्या रिंगणात उतरावे अन्यथा सोशल मीडियावर भांडाफोड केला जाईल असे बोलले जात आहे... सर्वसामान्य जनतेने आता नेत्यांची परीक्षा घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर करणार असल्याचे बोलला जात आहे. सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्काचे व्यासपीठ म्हणजेच सोशल मीडिया याच मीडियाचा वापर करून जनतेला स्वतःचे अस्तित्व टिकायचे आहे.. येणाऱ्या निवडणुकीत उमेदवार आणि नेत्यांसाठी कठीण काळ आहे हे मात्र नक्की..

# बाळासाहेब पवारांचा राष्ट्रवादीत प्रवेश अन् ग्रामस्थासह सर्वपक्षीय सत्कार

### जनतेच्या हिताचा विचार करणाऱ्या पक्षात प्रवेश



### वैचारिक अन् जनतेचा विचार करणारा पक्ष : बाळासाहेब पवार



आज पर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने जनतेच्या त्याच्या योजना आणून वैचारिक दृष्ट्या जनतेला सक्षम करण्यासाठी काम केले आहे त्याच दृष्टीने भविष्य काळामध्ये सुद्धा राजकीय क्षेत्रात काम करताना जनतेच्या अडीअडचणी सुटल्या पाहिजेत आणि जनतेला सर्व योजनेचा योग्य न्याय भेटला पाहिजे या हेतून मी प्रवेश केला आहे. आज ग्रामस्थासह सर्व पक्षातील कार्यकर्ते व मित्र परिवारांनी केलेला सन्मान हा खूप मोठा आहे त्याबद्दल सर्वांचे खूप खूप धन्यवाद...

**– बाळासाहेब पवार**
**माजी सरपंच कुसळंब.**

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने निर्माण केलेली वैचारिक फळी आज खऱ्या अर्थानं पुन्हा उभारी घेताना दिसत आहे.एकेकाळीचे माजी आमदार भीमराव धोंडे यांचे विश्वासू सहकारी कुसळंब गावचे माजी सरपंच बाळासाहेब बाप्पा पवार यांनी राष्ट्रवादी चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीमध्ये आ.धनंजय मुंडे व मा.आ.बाळासाहेब आजबे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही जनतेच्या हिताचा विचार करणारे पार्टी आहे. वैचारिकदृष्ट्या सक्षम अन विकासाच्या दृष्टीने विचार करणारे नेते पक्षात आहेत. सर्वांच्या मार्गदर्शनाखाली कुसळंब गावचे माजी सरपंच बाळासाहेब बाप्पा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केल्याने सर्वसामान्य जनतेमधून आनंद व्यक्त होत आहे तर पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव देखील होत आहे. कुसळंब ग्रामस्थासह सर्वपक्षीय कार्यकर्ते मित्रमंडळींनी मोठ्या उत्साहात त्यांचा कुसळंब ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सन्मान करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मनोज जरांगेंनी घेतली महादेव मुंडे यांच्या कुटुंबाची भेट

## बीडसह राज्यभर आंदोलनाचा दिला इशारा

**परळी । प्रतिनिधी**

महादेव दत्तात्रय मुंडे यांच्या खुनाच्या घटनेस १९ महिने झाले तरी अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेले नाही. आरोपींना तात्काळ अटक करावी व या प्रकरणाची विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी व्हावी, अशी मागणी महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांच्या माहेर कन्हेरवाडी व सासर भोपळा येथील ग्रामस्थांनी केली आहे. या मागणीसाठी २५ जुलै रोजी परळी-अंबाजोगाई रस्त्यावर कन्हेरवाडी येथे तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशाराही ग्रामस्थांनी सोमवारी पोलिस प्रशासनाला निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. मनोज जरांगेंनी घेतली मुंडे कुटुंबाची भेट दरम्यान, आज मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाची भेट घेतली. यावेळी महादेव मुंडे खून प्रकरणाची सविस्तर माहिती पत्नी ज्ञानेश्वरी व सतीश फड यांनी जरांगे पाटलांना दिली. यावेळी बोलताना जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांना महादेव मुंडे कुटुंबीयांना तात्काळ वेळ द्यावी आणि या प्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची मागणी मान्य केली. तसेच, आरोपींना अटक करावे, अन्यथा केवळ बीड जिल्हाच नव्हे, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही दिला.जरांगे पाटील पुढे



म्हणाले, या कुटुंबावर संकट कोसळले आहे. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू. न्याय कसा मिळत नाही, हेच आता पाहतो. यावेळी दादा, आता न्याय तुम्हीच द्या, अशी कळकळीची विनंती ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केली. तसेच यावेळी उपस्थित असलेल्या मीरा महादेव गीते यांनी, माझे पती महादेव गीते यांना खोट्या गुन्ह्यात अडकविण्यात आले आहे. आमच्या कुटुंबालाही न्याय मिळावा, अशी भावनिक मागणी जरांगे पाटलांकडे केली. दरम्यान, मनोज जरांगे पाटील परळीत आल्यामुळे प्रिया नगर भागातील महादेव मुंडे यांच्या घराजवळ पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता.

# निवडणुकीपेक्षा मतदाराच्या कुटुंबाचे भविष्य महत्त्वाचे! : गणेश कवडे



## निवडणुकीच्या प्रचारातून गणेश कवडे यांनी केली होती विचारांची पेरणी



**पाटोदा । प्रतिनिधी**

गेल्या तीन वर्षांपूर्वी निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. पाटोदा नगरपंचायतीच्या निवडणुकीत जनसेवक गणेश कवडे हे निवडणुकीच्या रिंगणात होते. वार्ड क्रमांक १७ मधून आपले विचार घेऊन जनतेला सामोरे गेले. त्यांनी विचारांची पेरणी केली होती परंतु निवडणुकीत आलेल्या अपयश ने खचून न जाता त्यांनी केलेली विचाराची पेरणी कुठेतरी कामाला येईल हे त्यांना माहीत होतं. प्रत्येक घरात एक दोन तास विचार पेरत होते त्या विचारातून निवडणुकीत जरी अपयश आलं तरी भविष्यात त्या कुटुंबाला बळ मिळणारे विचार दिले होते. तेच विचार आज आसिफ भाई शेख यांच्या घरात खरे होताना दिसले. त्यांच्या मुलांना विचारले होते कितवीत आहात शिक्षणाविषयी चर्चा करून शिक्षणाचे महत्त्व समजून सांगितले होते दहावीला चांगले मार्क आले तर पॉलिटेक्निकला नंबर लागेल असेही सांगितलं होतं.. हुजेब शेख त्या मुलानेही ते लक्षात ठेवलं अभ्यास केला दहावीला उत्तीर्ण झाली आज संभाजीनगरला गव्हर्मेंट कॉलेजला मेकॅनिकल इंजीनियरिंग ला नंबर लागला त्यांच्या घरच्यांनी मला कळवलं मी तात्काळ त्यांच्या घरी जाऊन हुसेब शेख याचा सत्कार केला याच समाधान असल्याचं जनसेवक गणेश कवडे यांनी सांगितले.. निवडणुका येतात निवडणुका जातात परंतु निवडणुकीतून काय घ्यायचं आणि काय द्यायचं हे आपणच ठरवायचं असतं. जनसेवक गणेश कवडे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यानंतर प्रत्येकाच्या घरात जाऊन पेरलेले विचार निवडणुकीत जरी कामाला आले नाही तरी त्या कुटुंबाच्या कामाला येतील या हेतून त्यांनी ते विचार पेरले होते. भविष्य त्या कुटुंबाचं चांगलं व्हावं चांगलं घडावं या हेतून त्यांनी निवडणुकीतून पेरलेले विचार आज खऱ्या अर्थानं साक्षात उतरले आहेत असं दिसत आहे.कवडे यांनी प्रत्येक घरात जाऊन जे विचार पेरले होते तेच उगताना दिसत आहेत. विचाराची ताकद खूप मोठी आहे की फक्त योग्य वेळ योग्य ठिकाणी पोहोच होऊन गरजेचं असतं तेच गणेश कवडे यांनी निवडणुकीच्या माध्यमातून केलं आणि त्याचे फळ सर्वांसमोर दिसत आहे असं म्हटलं तर वावगं वाटायला नको कारण की विचाराची देवाण-घेवाण ही तितकीच महत्त्वाची असते तितकी योग्य ठिकाणी योग्य वेळी जाणं गरजेचं आहे. जनसेवक गणेश कवडे यांच्यासारखे सर्वच राजकीय नेते विचार करू लागले तर राजकारणापेक्षा त्या कुटुंबाला सक्षम करण्यासाठी महत्त्वाचं पाऊल ठरेल हे मात्र नक्की आहे..

### निवडणुकीपेक्षा त्या कुटुंबाच्या चेहऱ्यावरील आनंद महत्त्वाचा : गणेश कवडे

निवडणूक येतात जातात परंतु जे मतदार मतदान रुपी आशीर्वाद देतात त्यांना विसरता कामा नये.. त्यांच्या कुटुंबाचं भविष्य आपल्या हाती असतं पण ते आपण विचारातून त्यांना घडवायचं असतं.. तेच काम निवडणुकीत केलं निवडणुकीपेक्षा प्रत्येक कुटुंबाला महत्त्वाचं समजून विचार दिले त्याच विचारातून अनेक कुटुंब यशस्वी होताना दिसत आहेत याच समाधान आहे. भविष्यात निवडणुकीपेक्षा एखाद्या कुटुंबाचं भविष्य घडवायला आवडेल...

**– जनसेवक गणेश कवडे**

हे पत्रक मालक, मुद्राक, प्रकाशक मुख्य संपादक सचिन मनोहर पवार, यांनी मिनाक्षी प्रिंट्स, कुसळंब ता. पाटोदा जि. बीड ४१३२०७ येथे छापून साप्ताहिक पाटोदा लोकवास्तव कार्यालय छत्रपती शिवाजी महाराज चौक, कुसळंब ता. पाटोदा जि. बीड ४१३२०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मुख्य संपादक सचिन मनोहर पवार मो.९९२१८०१९१९, Website : www.patodalokvastav.comEmail:patodalokvastavgmail.com